**रे.दि.मु.नं. २३२/२०२२ मधील नि.क्र. ५७ खालील आदेश.**
**बाबू शेख व इतर विरुध्द वहाब शेख/पटेल व इतर**
**आदेश पारित दिनांक ०३.०२.२०२४**

---

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे सरनाम्यामधील मजकुरामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरिता दाखल केला आहे. सदर अर्जासहीत वादी क्र. १ श्री. बाबू महंमद शेख याचे निशाणी क्र. ५८ वर सत्यप्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे प्रस्तुत अर्जामध्ये हे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये नजरचुकीने अमान वाहीद शेख पटेल हे नाव प्रतिवादी म्हणून सामिल करणे राहून गेले आहे. सदर प्रतिवादी दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून सामिल करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत दाव्यामध्ये ''प्रतिवादी क्र. १४ अमान वाहीद शेख पटेल - वय - २५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. पहिला मजला, दो-टाकी, डंकन रोड, मुंबई'' हा मजकूर दाव्याच्या सरनाम्यामध्ये लिहून तशी दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी व त्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यामध्ये दुरूस्ती होवून मिळावी, ही विनंती केली आहे आणि त्याच अनुषंगाने युक्तिवाददेखील केला आहे.

**०३.** सदरकामी, प्रतिवादी यांनी हे लेखी म्हणणे दाखल केले की, सदर अर्ज जास्तीत जास्त कॉस्टवर मंजूर करण्यास हरकत नाही, ही विनंती केली आहे.

**०४.** दाव्याचे आणि दाव्यातील समाविष्ठ सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता आणि वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचे म्हणणे ऐकले असता हे स्पष्ट झाले आहे की, प्रस्तुत दाव्याच्या सरनाम्यामध्ये ''प्रतिवादी क्र. १४ अमान वाहीद शेख पटेल - वय - २५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. पहिला मजला, दो-टाकी, डंकन रोड, मुंबई'' हा मजकूर नमूद करणे अनिवार्य आहे. त्यामुळे मुळ दावा कायदेशीर

प्रक्रियेनुसार चालविण्यासाठी सरनाम्यात वरील नमूद मजकूर नोंदवून वादीच्या प्रस्तूत अर्जातील विनंतीप्रमाणे अर्ज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, प्रस्तूत अर्जातील विनंतीप्रमाणे अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादींचा निशाणी क्र. ५७ चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती विहीत कालावधीमध्ये दाव्यामध्ये करावी व त्याप्रमाणे दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

स्वाक्षरीत/-
(अ. क. दामटे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.

दिनांक - ०३.०२.२०२४